मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 'माझी वसुंधरा'मध्ये पिंपरी महापालिका राज्यात प्रथम

## अभियान कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे उपलब्ध माहितीच्या आधारे आणि जागेवर जाऊन मूल्यांकन करण्यात आले

**पिंपरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व हवामान बदल विभागामार्फत राबविण्यात आलेल्या 'माझी वसुंधरा अभियान ५.०'च्या राज्यस्तरीय अंतिम निकालात १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या गटात पिंपरी चिंचवड महापालिकेने प्रथम क्रमांक पटकावून राज्यात अव्वल स्थान मिळविले आहे. तसेच भूमी विषयांतर्गत महापालिकेने उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे.

अभियान कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थांकडून राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे डेस्कटॉप मूल्यांकन व फिल्ड मूल्यांकन करण्यात आले. दोन्ही मूल्यांकनांमधील एकूण गुणांच्या आधारे राज्यातील १४ गटांतील विजेत्यांची निवड शासन मान्यतेनंतर जाहीर करण्यात आली. या प्रक्रियेत पिंपरी चिंचवड महापालिकेने पर्यावरण संरक्षण, हरित उपक्रम, कचरा व्यवस्थापन, जलसंवर्धन, ऊर्जा बचत आणि जनजागृती यामध्ये प्रभावी कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळविला आहे.




महापालिकेने शहरात मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण व संवर्धन, प्लास्टिक निर्मूलन उपक्रम, जलसंधारण प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन सुधारणा, हरित शाळा उपक्रम, सौरऊर्जा प्रकल्प, तसेच नागरिकांच्या सक्रिय सहभागातून विविध पर्यावरणपूरक मोहिमा राबवल्या आहेत. नागरिक, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था आणि औद्योगिक आस्थापनांच्या सहभागामुळे अभियानाला व्यापक यश मिळाले.

या यशाबद्दल महापौर रवि लांडगे, उप महापौर शर्मिला बाबर, आयुक्त श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, उपायुक्त डॉ.प्रदीप ठेंगल यांनी सर्व अधिकारी, कर्मचारी व नागरिकांचे अभिनंदन केले. राज्यस्तरावर मिळालेल्या या मानांकनामुळे पिंपरी चिंचवड शहराची पर्यावरणपूरक शहर म्हणून ओळख अधिक बळकट झाली आहे. आगामी काळात 'माझी वसुंधरा ६.० अभियान' ही देखील अधिक व्यापक स्वरूपात राबवून हरित, स्वच्छ आणि शाश्वत शहर घडविण्याचा संकल्प आहे.

> **माझी वसुंधरा अभियानामध्ये राबविण्यात आलेले विविध हरित प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापनातील सुधारणा आणि ऊर्जा बचतीसंदर्भातील उपक्रम यांचा एकत्रित परिणाम म्हणून हे यश मिळाले आहे. प्रशासनातील सर्व विभागांनी समन्वय राखत नियोजनबद्ध पद्धतीने काम केले.**
>
> **- विजयकुमार खोराटे,अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.**

> **माझी वसुंधरा ५.० अभियानामध्ये मिळालेला प्रथम क्रमांक हा महापालिकेच्या सर्व विभागांच्या समन्वयित कामकाजाचा आणि नागरिकांच्या सक्रिय सहभागाचा परिणाम आहे. पर्यावरण संरक्षण, शाश्वत विकास आणि हरित उपक्रमांना प्राधान्य देत आम्ही पुढील काळात अधिक तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि परिणामकारक प्रकल्प राबवू. 'माझी वसुंधरा ६.०' अंतर्गत अधिक व्यापक नियोजन करून पिंपरी चिंचवड शहराला पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकासाच्या दिशेने पुढे नेण्याचा आमचा निर्धार आहे.**
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महापालिका**

> **माझी वसुंधरा ५.० अभियानात मिळालेले यश हे पिंपरी चिंचवड शहराचे असून, पर्यावरण संवर्धनासाठी पिंपरी चिंचवड शहर कटिबद्ध असून भविष्यातही अधिक प्रभावी उपक्रम राबविण्यात येतील. आगामी काळात तंत्रज्ञानाधारित उपाययोजना आणि नवकल्पना यांना अधिक चालना देण्यात येईल.**
>
> **- श्रावण हर्डीकर , आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

> **पर्यावरण संवर्धन ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. 'माझी वसुंधरा ५.०' अंतर्गत जनजागृती, प्लास्टिक निर्मूलन, जलसंधारण आणि हरित उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**
>
> **- डॉ. प्रदीप ठेंगल, उपायुक्त,पिंपरी चिंचवड महापालिका.**

# उपमहापौर शर्मिला बाबर यांनी केली निगडी प्राधिकरण अग्निशमन केंद्राच्या कामाची पाहणी

## संबधित अधिका-यांकडून कामाची माहिती घेत काम मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून निगडी प्राधिकरण येथे नवीन अग्निशमन केंद्राच्या इमारतीच्या काम सुरू आहे. या इमारतीच्या कामाची महापालिकेच्या उपमहापौर शर्मिला बाबर यांनी नुकतीच पाहणी केली. यावेळी संबधित अधिका-यांकडून कामाची माहिती घेत काम मुदतीत पूर्ण करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने अ क्षेत्रीय कार्यालय स्थापत्य विभागाअंतर्गत निगडी प्राधिकरण येथील डॉ. हेडगेवार भवनाजवळ अत्याधुनिक अशा अग्निशमन केंद्राचे काम सुरू आहे. या कामाच्या ठिकाणी महानगरपालिकेच्या उपमहापौर बाबर यांनी स्थापत्य विभागाच्या अ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यकारी अभियंता वैशाली ननावरे आणि संबधित अधिकारी यांच्यासह भेट दिली.

अधिका-यांनी उपमहापौर शर्मिला बाबर यांना या कामाची माहिती दिली. दहा मजली इमारतीत तळमजल्यावर पार्किंग, अग्निशमन वाहन पार्कींग, स्टोअररुम, सुसज्ज कार्यालये, व्यायामशाळा, सदनिका इ. गोष्टींचा अंतर्भाव असणार आहे. अग्निशमन केंद्राच्या या इमारतीचे काम मुदतीत पूर्ण करावे. अग्निशमन विभागाला आवश्यक अशा सुविधा तेथे असतील, ही खबरदारी घ्यावी. कामाचा दर्जा राखावा, अशा सूचना यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर यांनी अधिका-यांना दिल्या.

# पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीतील 13 कोटींचे व्हीएमडी प्रकल्प कालबाह्य

## जुने तंत्रज्ञान, चुकीची ठिकाणे आणि कमी प्रतिसादामुळे स्मार्ट सिटीचा मोठा खर्च वाया

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेड कंपनीने तब्बल 13 कोटी रुपये खर्च करून शहरभरात लावलेले 60 व्हेरिबेल मेसेजिंग डिस्प्ले सिस्टीम (व्हीएमडी) कालबाह्य (आऊटडेटेड) झाले आहेत. जाहिराती प्रसिद्ध करणाऱ्यांसाठी लावलेले ते व्हीएमडी जुन्या तंत्रज्ञानामुळे आता उपयुक्त राहिलेले नाहीत. त्या माध्यमातून पाच वर्षांत केवळ 60 लाखांचे अल्प उत्पन्न मिळाले आहे. परिणामी, त्याचा खर्च पाण्यात गेल्याचे स्पष्ट होत आहे.

केंद्र शासनाच्या स्मार्ट सिटी अभियानातून नवी मुंबई महापालिका बाहेर पडल्याने पिंपरी-चिंचवड महापालिकेचा त्या महापालिकेच्या जागी 13 जुलै 2017 ला समावेश करण्यात आला. जाहिरातीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळेल, या हेतूने स्मार्ट सिटी कंपनीने पॅन सिटीअंतर्गत सन 2021 व 2022 मध्ये शहरभरातील 60 ठिकाणी व्हीएमडी उभारले गेले. त्यासाठी एकूण 12 कोटी 74 लाख 4 हजार 300 रुपये खर्च करण्यात आला.



### महापालिका अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित 100 व्हीएमडी उभारणार

**» स्मार्ट सिटीचे सर्व प्रकल्प 31 मार्च 2026 ला पिंपरी-चिंचवड महापालिकेकडे हस्तांतरित होणार आहे. स्मार्ट सिटीचे 60 व्हीएमडी हे जुने तंत्रज्ञानावर आधारित आहेत. त्यातील अनेक व्हीएमडी कालबाह्य झाले असून, निम्मे बंद आहेत. तसेच, अनेक व्हीएमडी चुकीच्या ठिकाणी आहेत. आकाशचिन्ह व परवाना विभागाकडून ते व्हीएमडी दुरुस्त करून अद्ययावत करण्यात येणार आहेत. त्याची संख्या 100 पर्यंत करून महापालिकेचे उत्पन्न वाढीवर भर देण्यात येणार आहे, असे महापालिकेच्या आकाशचिन्ह व परवाना विभागाचे उपायुक्त राजेश आगळे यांनी सांगितले.**

एक व्हीएमडी 21 लाख 23 हजार 405 रुपयांचा आहे. ते काम लार्सन अँण्ड टुब्रो लिमिटेड या ठेकेदार कंपनीने केले. त्यांची देखभाल व दुरुस्ती तीच कंपनी करत आहे ठेकेदारांमध्ये असलेल्या वादामुळे सर्व व्हीएमडी कार्यान्वित करण्यात बराच वेळ गेला. वीजबिल थकल्याने महावितरण कंपनीने व्हीएमडीचा वीजपुरवठा खंडीत केला होता. ते बिल कोण भरणार, यावरून ठेकेदार व कंपनीत तू तू मैं मैं ची स्थिती निर्माण झाली होती. अखेर, कंपनीने बिल भरल्याने पुन्हा वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. दरम्यानच्या काळात सर्वच व्हीएमडी अनेक महिने धूळ खात पडून होते.

त्यावर स्मार्ट सिटीने 2022 पासून जाहिराती प्रसिद्धी करण्यास सुरुवात केली. दर अधिक असल्याने तसेच, अनेक व्हीएमडी वर्दळीच्या ठिकाणी नसल्याने त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. सुमारे 5 वर्षांच्या कालावधीत केवळ 60 लाखांचे उत्पन्न मिळाले आहे. त्या माध्यमातून व्हीएमडी उभारण्याचा खर्चही निघालेला नाही.

### चार वर्षांत मिळाले 60 लाखांचे उत्पन्न

**» त्या 60 व्हीएमडीवर सन 2022 पासून जाहिराती प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली आहे. त्या माध्यमातून आत्तापर्यंत स्मार्ट सिटी कंपनीला एकूण 60 लाख 33 हजार 103 रुपयांचे उत्पन्न मिळाले आहे, असे स्मार्ट सिटीचे सहमुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव यांनी सांगितले.**

### 50 किऑस्क मशिनही अडगळीत

**» स्मार्ट सिटी लिमिटेड कंपनीच्या वतीने महापालिका भवन, सर्व आठ क्षेत्रीय कार्यालय, 16 विभागीय कर संकलन कार्यालये, रुग्णालये आदी ठिकाणी 50 किऑक्स लावण्यात आले होते. ते किऑक्स मशिन डिसेंबर 2019 पर्यंत बसविण्यात आले. एका मशिनची किमत तब्बल 5 लाख रुपये इतकी आहे. त्या माध्यमातून नागरिकांना मालमत्ताकर, पाणीपट्टीसह इतर शुल्क भरता येईल. नागरी समस्यांबाबत तक्रार करता येईल. महापालिकेच्या विविध विभागांची माहिती मिळेल, असे दावा करण्यात आला होता. ते सर्व किऑक्स वापराअभावी धूळ खात अडगळीत पडून आहेत.**

# छत्रपती शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वात 'शिवगर्जना' ठरतेय मुख्य आकर्षण

## 'शिवगर्जना' या भव्य महानाट्याच्या पहिल्या प्रयोगाला शिवप्रेमींनी प्रचंड प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

**पिंपरी | प्रतिनिधी**

'जय भवानी, जय शिवाजी', 'हर हर महादेव' च्या जयघोषात आणि स्वराज्याच्या इतिहासाची साक्ष देणाऱ्या नेत्रदीपक दृश्यांनी निगडी येथील नियोजित महापौर निवास परिसर अक्षरशः दुमदुमून गेला. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या 'विचार प्रबोधन पर्वा'अंतर्गत सादर करण्यात आलेल्या 'शिवगर्जना' या भव्य महानाट्याच्या पहिल्या प्रयोगाला शिवप्रेमींनी प्रचंड प्रतिसाद देत मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.



> **'शिवगर्जना' या महानाट्याच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची, दूरदृष्टीची आणि सुशासनाच्या तत्त्वांची प्रभावी मांडणी नव्या पिढीसमोर होत आहे. इतिहास केवळ वाचण्याचा विषय नसून तो अनुभवण्याचा आहे, आणि अशा भव्य सादरीकरणातून युवकांना स्वराज्याच्या मूल्यांची प्रेरणा मिळणे ही काळाची गरज आहे. या महानाट्यामुळे नागरिकांमध्ये राष्ट्राभिमानाची भावना अधिक दृढ होईल, असा विश्वास आहे.**
>
> **- रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते या महानाट्याचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, नगरसदस्य अमित गावडे, राजू मिसाळ, अभिषेक बारणे, चेतन भुजबळ, नगरसदस्या शैलजा मोरे, अर्चना कारंडे, माजी नगरसदस्य मारुती भापकर, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते जीवन बोराडे, सागर तापकीर, निलेश शिंदे, प्रकाश जाधव, संतोष सातपुते, आबासाहेब ढवळे, सतीश काळे, संतोष कवडे, श्रीमंत जगताप, नागनाथ म्हस्के, ज्ञानेश्वर लोमे, सचिन आल्हाट, संदीप निकम, कुणाल कांबळे, सचिन बोऱ्हाडे, संदीप बोराडे, सागर लश्करे, स्वप्निल शिंदे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा. राष्ट्रपती महोदयांसमोर सादर झालेल्या या भव्य महानाट्यप्रयोगात सुमारे २५० हून अधिक कलाकारांनी सहभाग नोंदवत शिवचरित्रातील महत्त्वपूर्ण ऐतिहासिक प्रसंग जिवंत केले. घोडे, उंट, भव्य नेपथ्य, पारंपरिक वेशभूषा, अत्याधुनिक प्रकाशयोजना, प्रभावी ध्वनीसंयोजन आणि नेत्रदीपक आतषबाजीच्या सहाय्याने उभारण्यात आलेल्या प्रत्येक दृश्याला उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांचा कडकडाट करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महानाट्यात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जन्माआधीचा सामाजिक व राजकीय कालखंड, बालपण, संत तुकाराम महाराज आणि शिवाजी महाराज यांची ऐतिहासिक भक्ती-शक्ती भेट, तोरणा विजय, स्वराज्य स्थापनेचा संघर्ष, शेतकऱ्यांसाठीचे आज्ञापत्र, प्रतापगड मोहीम, पन्हाळगड वेढा व सुटका, स्वराज्याच्या आरमाराची उभारणी, पुरंदरचा तह, आग्रा भेट, नरवीर तानाजी मालुसरे यांचा कोंढाणा विजय आणि भव्य शिवराज्याभिषेक सोहळा यांसारखे प्रसंग प्रभावीपणे सादर करण्यात आले. या सजीव सादरीकरणामुळे उपस्थितांमध्ये राष्ट्राभिमानाची भावना जागृत होत अनेकांनी उभे राहून या प्रसंगांना दाद दिली.

कार्यक्रमस्थळी नागरिकांसाठी सुयोग्य बैठक व्यवस्था, वाहतूक नियोजन, सुरक्षा व्यवस्था तसेच आवश्यक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे तसेच सहाय्यक सुरक्षा अधिकारी प्रमोद निकम यांच्या अधिपत्याखाली कायदा सुव्यवस्थेसाठी परिसरात २० सुरक्षारक्षकांची नेमणूक करण्यात आली होती.

# पुणेकरांवर कोणतीही करवाढ नाही!

## स्थायी समितीच्या बैठकीत मिळकतकरात प्रस्तावित केलेली पाच टक्के करवाढ बुधवारी फेटाळण्याचा निर्णय सर्वसाधारण सभेत घेतला.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिका प्रशासनाने स्थायी समितीच्या बैठकीत मिळकतकरात प्रस्तावित केलेली पाच टक्के करवाढ बुधवारी फेटाळण्याचा निर्णय सर्वसाधारण सभेत घेतला. यामुळे पुणेकरांवरील करवाढीचे संकट टळले आहे. महापालिका निवडणुकीनंतर महापालिकेत सत्ताधारी झालेले भाजप पहिल्याच वर्षी पुणेकरांवर करवाढ लादणार का? असा प्रश्न उपस्थित केला जात होता.

पुणे महापालिकेच्या २०२६-२७ या वर्षाच्या अंदाजपत्रकाची तयारी प्रशासनाकडून सुरु आहे. त्यामध्ये २० फेब्रुवारीपूर्वी मिळकतकराबाबत निर्णय घेणे बंधनकारक आहे. दोन आठवड्यापूर्वी प्रशासक म्हणून जबाबदारी सांभाळताना आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत मिळकत करामध्ये पाच टक्के वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हा प्रस्ताव अंतिम मान्यतेसाठी सर्वसाधारण सभेत बुधवारी मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता.

महापालिकेने दहा वर्षांपासून कर वाढ केली नाही. महापालिकेला मिळणारे उत्पन्न आणि खर्च यामधील तफावत कमी करण्यासाठी करवाढ करावी, असे आयुक्त राम यांनी सुचविले होते. त्यासाठी प्रशासनाने १० टक्के मिळकत करामध्ये वाढ करण्याचे प्रस्तावित केले होते. मात्र स्थायी समितीच्या बैठकीत आयुक्त नवल किशोर राम यांनी करवाढ १० टक्क्यांवरून पाच टक्के करण्याचा निर्णय घेतला होता.

चार वर्षानंतर महापालिकेतील प्रशासकराज संपुष्टात आले. निवडणुका झाल्याने लोकप्रतिनिधी सभागृहात आले आहेत. त्यामुळे करवाढ करण्याचा निर्णय घेतल्यास त्याचे संपूर्ण खापर सत्ताधारी भाजपावर फुटण्याची शक्यता होती. त्यामुळे हा प्रस्ताव बुधवारी झालेल्या सर्वसाधारण सभेत फेटाळण्यात आला.

दरम्यान, सर्वसाधारण सभेत मिळकतकर विभागाच्या कारभारावर टीका करण्यात आली. करवाढ करण्याची वेळ प्रशासनावर का आली? प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी कर वसुलीसाठी आवश्यक ते प्रयत्न करत नाहीत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात मिळकत कराची थकबाकी प्रलंबित आहे. याचा सविस्तर अहवाल प्रशासनाने सभागृहासमोर ठेवावा, असे आदेश महापौर मंजुषा नागपुरे यांनी दिले.

समाविष्ट गावातील थकीत मिळकत कराबाबत निर्णय घेतला जात नाही. अधिक दराने मिळकत कर घेतला जातो. महापालिकेत समाविष्ट झाल्यानंतर सुविधा मिळतील असे वाटले होते. पण अनेक पायाभूत सुविधा मिळत नाही. समाविष्ट गावातील कर आकारणी बाबत पुनर्विचार करण्याची गरज आहे. पाच पट मिळकत कर घेतला जातो, हे बदलले पाहिजे. महापालिकेत आलोय त्यातील एकही अपेक्षा पूर्ण झाली नाही, असे सुभाष नाणेकर म्हणाले.




### करवाढीमागील कारणे व राजकीय पार्श्वभूमी

» महापालिकेने गेल्या दहा वर्षांत करवाढ केलेली नसल्याचे प्रशासनाचे म्हणणे होते. वाढते खर्च आणि मर्यादित उत्पन्न यातील तफावत भरून काढण्यासाठी करवाढ आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. मात्र निवडणुकांनंतर नव्याने सत्तेत आलेल्या पक्षावर करवाढीची राजकीय जबाबदारी येण्याची शक्यता असल्याने प्रस्तावावर विरोध झाला. चार वर्षांनंतर प्रशासकराज संपल्यानंतर लोकप्रतिनिधी सभागृहात आले असून पहिल्याच वर्षी करवाढ टाळण्याचा निर्णय घेण्यात आला.

### मिळकतकर वाढीचा प्रस्ताव फेटाळला

» पुणे महानगरपालिकेच्या स्थायी समितीत प्रस्तावित अहवालात पाच टक्के विकास स्थितीत फेटाळण्यात आली. २०२६-२७ च्या अंदाजपत्रकाच्या मांडणीचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. राज्य १० टक्के गती सुचना आली होती; मात्र फक्त ना किशोर राम अध्यक्षते खालील ती ५ च्या अंतर्गतवर आणण्यात आली. विचार मांडणीसाठी अंतिम निर्णय आला; लोकप्रतिनिधींनी तो नाकारला.

### थकबाकी व समाविष्ट गावांचा मुद्दा

» सर्वसाधारण सभेत मिळकतकर विभागाच्या कारभारावर टीका करण्यात आली. मोठ्या प्रमाणात थकबाकी प्रलंबित असून वसुलीमध्ये त्रुटी असल्याचा आरोप झाला. महापौर मंजुषा नागपुरे यांनी थकबाकीबाबत सविस्तर अहवाल सादर करण्याचे आदेश दिले. समाविष्ट गावांतील नागरिकांनी जादा कर आकारणी आणि अपुऱ्या सुविधांबाबत नाराजी व्यक्त करत कररचनेचा पुनर्विचार करण्याची मागणी केली.

# एनओसीसाठी 193 अर्ज; स्वीकृत नगरसेवकपदासाठी महापालिकेत लगबग

## महापालिकेत 10 स्वीकृत नगरसेवक नेमले जाणार त्यात, सर्वाधिक 7 सदस्य भाजपचे असून, दोन राष्ट्रवादीचे तर एक कॉंग्रेसचा असणार आहे

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत स्वीकृत नगरसेवकपदी वर्णी लावण्यासाठी राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांकडून जोरदार फिल्डींग लावण्यात आली असून, आतापर्यंत सुमारे १९३ जणांनी ना हरकत प्रमाणपत्र मिळावे यासाठी अर्ज केले आहेत.

तर प्रशासनाकडून आतापर्यंत सुमारे १६३ जणांना एनओसी देण्यात आली आहे. महापालिकेत १० स्वीकृत नगरसेवक नेमले जाणार आहेत. त्यात, सर्वाधिक ७ सदस्य भाजपचे असून, दोन राष्ट्रवादीचे तर एक कॉंग्रेसचा असणार आहे.

महापालिका निवडणुका झाल्यानंतर आता या महिन्यात महापौर तसेच स्थायी समितीसह सर्वच विशेष समिती सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानंतर आता प्रशासनाकडून स्वीकृत सदस्य नेमण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. महापालिका आयुक्तांनी ही प्रक्रिया महापालिकेतील राजकीय पक्षांच्या गटनेत्यांशी चर्चा करून करायची आहे.

ही नियुक्ती महापौर निवडीनंतर लगतच्या महिन्यातील मुख्यसभेत केली जाणार असल्याने मार्च २०२६ च्या मुख्यसभेत ही निवड केली जाणार आहे. त्यासाठी सर्वच राजकीय पक्षांकडून कार्यकर्त्यांकडून अर्ज भरून घेतले जात आहेत.

स्वीकृत सदस्यांसाठीही महापालिकेच्या निवडून आलेल्या सदस्यांप्रमाणेच महापालिकेची कोणतीही देणी नसलेले ना हरकत प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे. त्यासाठी पालिका प्रशासनाकडून ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्या अंतर्गत आतापर्यंत १६९ अर्ज प्राप्त झाले आहेत.




### भाजपकडून धक्कातंत्र

» महापालिकेत ११९ सदस्य निवडून आल्याने महापालिकेत नियमानुसार भाजपचे सर्वाधिक सात स्वीकृत नगरसेवक असणार आहेत. यासाठी भाजपने तब्बल ५२ जणांची यादी पक्षाच्या राज्याच्या कोअर कमिटीकडे पाठविली आहे.तर, भाजपकडून आधीच माजी नगरसेवक तसेच निवडणुकीत पराभव झालेल्या उमेदवारांना संधी दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे भाजपकडून स्थायी समिती प्रमाणेत स्वीकृत नगरसेवक निवडीत धक्कातंत्र वापरले जाणार असल्याची शक्यता आहे. तर कॉंग्रेस, राष्ट्रवादीतही नवीन चेहऱ्यांना संधी देण्याची मागणी केली जात आहे.

# श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर 'या' दिवशी भक्तांसाठी खुले

## काम पूर्ण करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, असे स्पष्ट संकेत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.




**पुणे | प्रतिनिधी**

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या आणि भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर येथील मंदिर १० एप्रिल २०२६ पासून सर्व दर्शनार्थींसाठी खुले करण्यात येणार आहे. सध्या सुरू असलेल्या विकासकामांसाठी मंदिर बंद ठेवण्यात आले असून, हे काम पूर्ण करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही, असे स्पष्ट संकेत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले आहेत.

भीमाशंकर विकास आराखडा राबवताना स्थानिक ग्रामस्थांना विश्वासात घेऊन कामे सुरू आहेत. या विकासामुळे स्थानिकांना आर्थिक लाभ होईल. तसेच, पर्यटन वाढवण्यासाठी दरवर्षी 'भीमाशंकर महोत्सव' आयोजित करण्याचे नियोजन आहे. विशेष म्हणजे, कर्जत तालुक्यातील खांडस मार्गे भीमाशंकरला येण्यासाठी लवकरच रोपवे उभारला जाणार आहे, ज्यामुळे भाविकांचा प्रवास सुखकर होईल.

भीमाशंकरच्या जंगलाचे वैभव असलेल्या महाराष्ट्राचा राज्यप्राणी 'शेकरू' याच्या संवर्धनाला मोठे यश आले आहे. २०२१ मध्ये अभयारण्यात १८०० शेकरू होते, तर आता ही संख्या २३४० वर पोहोचली आहे. नुकत्याच झालेल्या 'ग्रँड टूर' स्पर्धेचे मॅस्कॉट शेकरू असल्याने जागतिक स्तरावर याची ओळख निर्माण झाली आहे.

अनेक वर्षांपासून भेडसावणारा सांडपाण्याचा प्रश्न आता सुटला आहे. वन्यजीव विभागाकडून सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी मान्यता मिळाली असून, पाणीपुरवठा आणि ड्रेनेजची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. ९ जानेवारीपासून मंदिरातील गाभाऱ्याचे आणि परिसरातील विकासाचे काम सुरू असल्याने दर्शन बंद ठेवण्यात आले आहे. पुढील काही महिन्यांत खोदकाम आणि तोडफोडीची प्रमुख कामे पूर्ण होतील. त्यानंतर १० एप्रिलला मंदिर दर्शनासाठी खुले होईल आणि श्रावण महिन्यापर्यंत भाविकांसाठी सर्व सुविधा सज्ज असतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### कुंभमेळ्यापूर्वी रस्ते चकाचक

» आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर भीमाशंकरकडे येणारे प्रमुख रस्ते सुधारले जाणार आहेत. यामध्ये तळेगाव टोलनाका ते भीमाशंकर, चाकण-राजगुरुनगर आणि मंचर-घोडेगाव या रस्त्यांचा समावेश आहे. तसेच तळेघर, शिरगाव, भोरगिरी आणि निगडाळे येथील अंतर्गत रस्तेही रुंद आणि मजबूत केले जाणार आहेत.

### महाशिवरात्रीच्या पूजेनंतर घोषणा

» महाशिवरात्रीनिमित्त आयोजित शासकीय महापूजेसाठी जिल्हाधिकारी भीमाशंकर येथे उपस्थित होते. यावेळी त्यांनी सांगितले की, ९ जानेवारीपासून मंदिरातील गाभाऱ्याचे आणि परिसरातील विकासाचे काम सुरू असल्याने दर्शन बंद ठेवण्यात आले आहे. पुढील काही महिन्यांत खोदकाम आणि तोडफोडीची प्रमुख कामे पूर्ण होतील. त्यानंतर १० एप्रिलला मंदिर दर्शनासाठी खुले होईल आणि श्रावण महिन्यापर्यंत भाविकांसाठी सर्व सुविधा सज्ज असतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### सांडपाण्याचा प्रश्न मार्गी

» येथे अनेक वर्षांपासून भेडसावणारा सांडपाण्याचा प्रश्न आता सुटला आहे. वन्यजीव विभागाकडून सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी मान्यता मिळाली असून, पाणीपुरवठा आणि ड्रेनेजची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत.

# हिंजवडी मेट्रोचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण, पण विद्यापीठ चौकातील उड्डाणपूल पुन्हा रखडला

## येत्या दोन-तीन महिन्यांत मेट्रोही सुरु करण्याचे आश्वासन 'पीएमआरडीए'चे आयुक्त योगेश म्हसे यांनी दिले आहे.



**पुणे | प्रतिनिधी**

गणेशखिंड रस्त्यावरील आचार्य आनंदऋषीजी महाराज चौकातील (विद्यापीठ चौक) उड्डाणपूल मंगळवारपर्यंत (१७ फेब्रुवारी) सुरू करण्यात येणार होता. मात्र, क्षमता चाचणी, रंगरंगोटी, राडारोडा साफ करणे इत्यादी किरकोळ कामे रखडल्याने या उड्डाणपुलाचे लोकार्पण लांबणीवर पडले आहे. दरम्यान, याच पुलावर हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रोचे काम सुरू असून, येत्या दोन-तीन महिन्यांत हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो धावणार असल्याचे आश्वासन 'पीएमआरडीए'चे आयुक्त योगेश म्हसे यांनी दिले आहे.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी शनिवारी (१४ फेब्रुवारी) सरहद संस्थेच्या कार्यक्रमात विद्यापीठ चौकातील उड्डाणपूल तीन दिवसांत खुला करणार असल्याची माहिती दिली होती. कोणताही औपचारिक कार्यक्रम आयोजित न करता हा पूल वाहतुकीसाठी खुला करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्याचेही त्यांनी स्पष्ट केले होते. मात्र, तीन दिवस उलटूनही हा उड्डाणपूल वाहतुकीसाठी खुला करण्यात आला नाही.

आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी उड्डाणपुलाच्या संरचनात्मक लेखापरीक्षणाची मागणी केली. तसेच, उड्डाणपुलावर पडलेला राडारोडा उचलण्यात आलेला नाही, रंगरंगोटीची कामेही प्रलंबित आहेत. त्यामुळे हा पूल येत्या काही दिवसांमध्ये वाहतुकीसाठी खुला होणार का, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे.

### विद्यापीठ चौक उड्डाणपूल – उद्घाटन का रखडले?

» आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी तीन दिवसांत पूल सुरू करण्याची घोषणा केली होती. औपचारिक कार्यक्रम न करता पूल खुला करण्याच्या सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले होते. दरम्यान, आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी पुलाच्या संरचनात्मक लेखापरीक्षणाची मागणी केली आहे. पुलावर साचलेला राडारोडा व अपूर्ण रंगकामामुळे सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. सध्या पुलाची एक बाजू खुली असल्याने बाणेरकडून शिवाजीनगरकडे जाणारी वाहतूक काही प्रमाणात सुरळीत झाली आहे; मात्र पूर्ण पूल सुरू न झाल्याने शिवाजीनगरकडून पाषाणकडे जाणाऱ्यांना कोंडीचा सामना करावा लागत आहे.

### प्रशासनाची बाजू काय ?

» 'विद्यापीठ चौकातील उड्डाणपुलाची क्षमता चाचणी, रंगरंगोटी, राडारोडा साफ करणे आदी किरकोळ कामांना वेळ लागतो आहे. सर्व प्रकारची कामे पूर्ण करून, हा उड्डाणपूल लवकरात लवकर वाहतुकीसाठी खुला करण्यात येणार आहे,' असे पीएमआरडीएच्या मुख्य अभियंता रिनाज पठाण यांनी सांगितले.